❍ दि. १४ फेब्रुवारी २०२६
❍ शनिवार
❍ वर्ष ४ थे
❍ अंक १०२
❍ किंमत २ रूपये
❍ पृष्ठे ४
❍ लातूर
❍ RNINO.MHMAR/25/A1409

दैनिक

# अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे    उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**


### आजचे पंचाग

❍दिनांक : १४ फेब्रुवारी २०२६
❍वार : शनिवार
❍माह (अमावस्यांत) : माघ
❍माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
❍ऋतु : शिशिर
❍आयन : उत्तरायण
❍पक्ष : कृष्ण पक्ष
❍तिथी : द्वादशी तिथी (दुपारी ०४:०१ पर्यंत) त्यानंतर त्रयोदशी ि तथी
❍नक्षत्र : पूर्वाषाढा नक्षत्र (सायंकाळी ०६:१५ पर्यंत) त्यानंतर उत्तराषाढा नक्षत्र
❍योग : सिद्धि योग (१५ फेब्रुवारी पहाटे ०३:१७ पर्यंत) त्यानंतर व्यातीपात योग
❍करण : तैतुला करण (सायंकाळी ०४:०१ पर्यंत) त्यानंतर गराजा करण
❍चंद्र राशी : धनु राशी (१५ फेब्रुवारी रात्री १२:४१ पर्यंत) त्यानंतर मकर राशी
❍सूर्य राशी : कुंभ राशी
❍अशुभ मुहूर्त:
❍राहु काळ : सकाळी १०:०१ ते सकाळी ११:२७ पर्यंत
❍शुभ मुहूर्त:
❍अभिजित : दुपारी १२:३० ते दुपारी ०१:१६
❍सूर्योदय : सकाळी ०७:०९
❍सूर्यास्त : सायंकाळी ०६:३७
❍संवत्सर : विश्वावसु
❍संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
❍विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
❍शक संवत: १९४७ शक संवत



## जपानसोबतचे आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध, देवेंद्र फडणवीस यांनी दिली माहिती

मुंबई : महाराष्ट्र आणि जपानच्या वाकायामा प्रांतामधील संबंध मैत्रीपूर्ण आहेत. तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा उद्योग क्षेत्रात सहकार्य अधिक वाढवून हे संबंध येणाऱ्या काळात अधिक दृढ करण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जपानसोबतचे आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जपानच्या वाकायामा प्रांताचे राज्यपाल मियाझाकी इजुमी यांनी जपानच्या शिष्टमंडळासह हॉटेल ताजमहल येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मुंबई ही भारताची आर्थिक, व्यावसायिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन व्यवसायाची राजधानी आहे. 'सिस्टर स्टेट' असलेल्या महाराष्ट्राचे आणि वाकायामा प्रांताचे अनेक वर्षांपासून मैत्रीचे संबंध आहेत. महाराष्ट्र आणि वाकायामा प्रांतादरम्यान २०१३ मध्ये सहकार्याचा सामंजस्य करार झाला होता आणि २०२३ मध्ये त्याचे नूतनीकरण करण्यात आले. या कालावधीत दोन्ही राज्यांमध्ये सांस्कृतिक, क्रीडा, पर्यटन आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय देवाणघेवाण झाली आहे. वाकायामा प्रांताच्या सहकार्याने जपानी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून अजिंठा परिसरातही जपानी पर्यटकांसाठी सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

(पान २ वर)

### रिलायन्सला मिळाला व्हेनेझुएलातून तेल खरेदीचा परवाना

मुंबई : व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांचे अमेरिकेने लष्करी बळावर अपहरण केले. यानंतर अमेरिकेने व्हेनेझुएलातील तेलाच्या उत्खननासाठी सरकारी आणि खासगी कंपन्यांना परवाने देण्यास सुरुवात केली आहे. भारतातल्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीला व्हेनेझुएलातील तेलाच्या उत्खननासाठी परवाना मिळाला आहे. हा परवाना मिळाल्यामुळे भारतीय उद्योजक मुकेश अंबानी यांची रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ही कंपनी व्हेनेझुएलात तेलाचे उत्खनन करू शकेल.

व्हेनेझुएलाच्या तेलात सल्फरचे प्रमाण जास्त आहे. या तेलाचे शुद्धीकरण करण्याचे तंत्रकौशल्य रिलायन्सच्या रिफायनरीकडे आहे. यामुळे रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीला परवाना मिळवणे सोपे झाले. अब्जाधीश मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स समुहाच्या रिफायनरी व्हेनेझुएलाच्या तेलाचे शुद्धीकरण करण्यासाठी सर्वाधिक सक्षम आहेत. (पान २ वर)

## डिझेल गाड्या कायमच्या होणार बंद ? काय सांगतो नीती आयोगाचा अहवाल?




मुंबई: भारतात प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकार २०२७ पर्यंत १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये डिझेलवर चालणाऱ्या प्रवासी वाहनांवर बंदी घालण्याचा विचार करत आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या समितीने या संदर्भात शिफारस केली आहे, ज्यामुळे डिझेल वाहनांचे उत्पादन आणि वापर टप्प्याटप्प्याने बंद होऊन इलेक्ट्रिक आणि सीएनजी वाहनांना चालना मिळण्याची शक्यता आहे.

भारताने २०७० पर्यंत 'शुद्ध-शून्य उत्सर्जन' लक्ष्य गाठायचे असेल, तर वाहतूक क्षेत्रात आमूलाग्र बदल अपरिहार्य असल्याचे नीती आयोगच्या ताज्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. डिझेल वाहनांना टप्प्याटप्प्याने हटवून सीएनजी, हायब्रिड आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वेगाने स्वीकार करणे ही पहिली आणि महत्त्वाची पायरी ठरेल, असे आयोगाने नमूद केले आहे.

अहवालानुसार, शहरी प्रदूषण आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी डिझेल वाहनांची संख्या कमी करणे आवश्यक आहे. त्याऐवजी सीएनजी, हायब्रिड आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवावा. यासोबतच इथेनॉल मिश्रित इंधनावर चालणाऱ्या फ्लेक्स-फ्युएल वाहनांना, उच्च बायो-सीएनजी मिश्रणाला आणि हायब्रिड फ्लेक्स-फ्युएल मॉडेल्सना प्रोत्साहन देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

आता पुढे काय बदलणार?

ग्राहकांसाठी : आगामी काळात डिझेल गाड्यांची खरेदी महाग पडू शकते किंवा त्यांचे उत्पादन थांबविले जाऊ शकते,

पर्याय : हायब्रिड आणि फ्लेक्स फ्यूल इंजिन असलेल्या गाड्यांकडे कल वाढणार.

(पान २ वर)

## विमानात मोठ्या आवाजात गाणी ऐकणार तर...; विमान वाहतूक मंत्रालयाने जारी केले नवे नियम



मुंबई : लांबच्या ठिकाणी जलद पोहोचण्यासाठी आजकाल सर्रास विमानांचा वापर केला जातो. ट्रेन किंवा बसने प्रवास करताना आपल्याला खिडकीच्या बाहेर पाहता येत, अनेक लोकांमुळे मनोरंजन होत असत. पण विमानाचा प्रवास हा कंटाळवाणा असतो. त्यामुळे अनेक जण जास्त करून संगीताचा किंवा चित्रपटाचा आधार घेतात. याच गोष्टींवर विमान वाहतूक मंत्रालयाने आता एक नवीन नियम जारी केला आहे . या नव्या नियमच उल्लंघन केल्यास थेट जेलची वारीही घडू शकते.

अनेक जण आपल्या मनोरंजनासाठी मोठ्या आवाजात गाणी लावतात, त्यामुळे इतर प्रवाश्यांसाठी ते गैरसोयीचे आणि त्रासदायक होते. याच प्रवाश्यांची दखल विमान वाहतूक विभागाने घेतली आहे. सार्वजनिक ठिकाणी असे मोठ्या आवाजात गाणी लावणे हे नियमांचे उल्लंघन असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. केंद्रीय विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी लोकसभेत याबद्दल सविस्तर माहिती दिली. (पान २ वर)

### मंत्रालयात लाच घेताना लिपिकाला अटक

मुंबई : अन्न व औषध प्रशासन विभागातील लिपिकाला लाच घेताना मंत्रालयात सापळा रचून मोठी कारवाई केली. राजेंद्र ढेरंगे असे अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.

औषध दुकानाचा निलंबित परवाना पूर्वरत करून देण्यासाठी त्याने ५० हजारांची लाच मागितली होती. तडजोडीअंती ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक करण्यात आली. मंत्रालयातल्या दुसऱ्या मजल्यावर ही कारवाई झाल्याने चर्चांना उधाण आले आहे. तक्रार आल्यानंतर मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या (पान २ वर)

## विजय मल्ल्या भारतात परतणारच नसतील तर आम्ही याचिका का ऐकावी?



मुंबई : फरार आर्थिक गुन्हेगार विजय मल्ल्याने आधी भारतात परत यावे. आम्ही तातडीने त्यांच्या याचिकेवर सुनावणी सुरू करू. जर ते परत येणारच नसतील तर आम्ही ही याचिका का ऐकावी?, यातून काय साध्य होईल?, अशी स्पष्ट भूमिका गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयाने घेतली.

केंद्र सरकारच्यावतीनंही हीच भूमिका मांडत विजय मल्ल्याने भारतात परत येऊन चर्चा करावी, त्यांचा काय दावा आहे?, ते कुठलं कर्ज मान्य करतात, कुठलं नाही?, ते कधी आणि कसे पैसे परत करणार?, आम्ही त्यांचं म्हणणे ऐकून घेण्यास तयार असल्याचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी स्पष्ट केले.

विजय मल्ल्या सध्या लंडनमध्ये असल्याचे त्यांच्यातर्फे ज्येष्ठ वकील अमित देसाई यांनी उच्च न्यायालयात सांगितले. त्यावर, आर्थिक घोटाळा करून परदेशात पसार झालेल्यांनी तिथं बसून याचिका करू नये. आधी भारतात कधी येणार ते सांगा?, मग आम्ही त्यांची याचिका ऐकू, असे स्पष्ट करत समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेला स्थगिती दिली जाणार नाही. तसेच तुमची याचिका फेटाळून लावत आम्ही तुम्हाला ही अखेरची संधी देत आहोत, (पान २ वर)

### सलग दुसऱ्या दिवशी सोने आणि चांदीच्या दरात लक्षणीय घसरण



मुंबई: शुक्रवार १३ फेब्रुवारी रोजी सलग दुसऱ्या दिवशी सोने आणि चांदीच्या दरात लक्षणीय घसरण झाली आहे.

मल्टी-कमोडिटी एक्सचेंज वर, एकाच दिवसात सोने आणि चांदीच्या किमती ३२ हजार रुपयांपर्यंत घसरल्या. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी, सोन्याची किंमत १,५२,३०० रुपयांपर्यंत घसरली, ती ४.० टक्क्यांची लक्षणीय घट होती. दरम्यान,चांदी २ लाख ३७ हजार, १३६ वर बंद झाली.

आज, शुक्रवार, कमोडिटी मार्केटसाठी आठवड्याचा शेवटचा दिवस आहे. आज सोने आणि चांदीच्या किमती आणखी कमी होतील की त्यांना काही शॉर्ट-कव्हरिंग दिसेल? हा मोठा प्रश्न आहे.

सोनं-चांदीच्या किमतींमध्ये सध्या एवढे चढउतार पहायला मिळत आहे की गुंतवणूकदार आणि खरेदी करणारे ग्राहक, दोघेही प्रचंड हैराण झालेआहेत. आज जो दर आहे, उद्या तोच कायम तर सोडाच, पणत्याच्या आसपासही असेल की नाही ही शंका रोजच्या रोज सतावते.

(पान २ वर)

## फेब्रुवारीत 'या दिवशी' काही भागांत कोसळणार पावसाच्या सरी

मुंबई : फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कोरडे वातावरण राहिल्यानंतर आता राज्यात हवामानाची घडी बदलताना दिसत आहे. उत्तर भारतात सक्रिय झालेल्या वातावरणाचा परिणाम महाराष्ट्रावरही जाणवू लागणार असून येत्या १७ आणि १८ फेब्रुवारीदरम्यान काही भागांत हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते, समुद्राकडून येणाऱ्या ओलसर वाऱ्यांचा आणि जमिनीवरील तापमानातील फरकाचा परिणाम म्हणून कमी दाबाची रेषा तयार होत आहे. या परिस्थितीमुळे पुणे विभागासह मध्य महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहू शकते. काही ठिकाणी किरकोळ सरी पडण्याची शक्यता आहे. हा पाऊस जास्त वेळ राहणारा नसला तरी स्थानिक पातळीवर बदल जाणवू शकतो.

दरम्यान, राज्यात उत्तर दिशेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा प्रभाव कायम आहे. त्यामुळे किमान तापमानात किंचित घट झाली असून रात्रीचा गारवा वाढला आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि खान्देश भागात सकाळ-संध्याकाळ थंडीची जाणीव होत आहे. पुढील एक-दोन दिवस ही स्थिती कायम राहू शकते.

(पान २ वर)

## अंतराळ संशोधन क्षेत्रात ग्रामीण विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी इस्रो विज्ञान सहल

मुंबई : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विज्ञान प्रेरणा अभियान अंतर्गत विजाभज आश्रमशाळांमधील १०० गुणवंत विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) येथे विशेष शैक्षणिक विज्ञान सहलीचे १५ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.

मंत्री सावे म्हणाले, ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाविषयी जिज्ञासा, संशोधनाची वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अंतराळ संशोधन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून त्या संधी ग्रामीण विद्यार्थ्यांना प्राप्त होण्यासाठी शासनाने विशेष उपक्रम हाती घेतला.

मंत्री सावे म्हणाले, राज्यातील विविध 'विजाभज' आश्रमशाळांमधून गुणवत्ता परीक्षेद्वारे १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना इस्रो येथे भेट देऊन उपग्रह निर्मिती, प्रक्षेपण तंत्रज्ञान, प्रत्यक्ष रॉकेटचे प्रक्षेपण पाहणे आणि अंतराळ संशोधन प्रकल्पांविषयी प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच विज्ञानविषयक कार्यशाळा आणि शास्त्रज्ञांशी, तज्ज्ञांशी संवादाच्या माध्यमातून त्यांना अनुभवाधारित शिक्षणाचा लाभ होणार आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील वैज्ञानिक संस्थांशी जोडणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि उच्च शिक्षणाच्या संधींबाबत (पान २ वर)




## सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर, दि.१३- ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ फेब्रुवारी ते २ मार्च यादरम्यान पार पडणाजया या महोत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेआहे. महोत्सवासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली असून या यात्रा महोत्सवात अधिका अधिक भाविक व नागरिकांना सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रशासक सचिन जांबूतकर यांच्या विश्वस्तांनी केले आहे.

### महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात



राज्यभर परिचित असलेल्या लातूर येथील श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर यात्रा महोत्सव महाशिवरात्रीदिनी म्हणजेच दि. १५ फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे. या महोत्सवानिमित्त शनिवार मध्यरात्री व रविवार पहाटे गवळी समाजाच्या वतीने श्री सिध्देश्वरास दुग्धाभिषेक होणार आहे. यानंतर श्रीच्या दर्शन सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. रविवारी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या हस्ते श्रीची महापुजा होवून झेंडावंदनाने यात्रा महोत्सवास प्रारंभ होणार आहे. तसेच संत सावतामाळी भजनीमंडळ व माळी समाजाच्या वतीने माळी गल्ली येथून मिरवणूक निघून पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. याच दिवशी म्हणजे रविवार दि. १५ रोजी दुपारी १ वाजता मार्केट यार्ड परिसरातील गौरीशंकर मंदीर येथून पारंपारिक झेंड्यांच्या काठ्याची मिरवणूक निघणार आहे. सदर मिरवणूकीचा समारोप श्री सिध्देश्वर मंदीर येथेहोणार आहे. रात्री ९ ते ११ या दरम्यान हभप श्री संजय महाराज खडक उमरगेकर यांचे किर्तन तर रात्री ११ ते १ या दरम्यान सुरमणी बाबुराव बोरगावकर, व तालमणी रामभाऊ बोरगावकर यांचे संगीत भजन पार पडणार आहे.

सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी विरशैव तेली समाज बांधवांतर्फे श्रीस गंगेच्या पाण्याचा अभिषेक होणार आहे. यादिवशी संध्याकाळी आळंदी येथील हभप श्री माऊली महाराज कदम यांचे किर्तन पार पडणार आहे. मंगळवार दि. १७ फेब्रुवारी रोजी हभप श्री ज्ञानसिंधू संदीपान महाराज हासेगावकर यांचे किर्तन होणार असून बुधवार दि. १८ रोजी हभप श्री गुरुवर्य पुंडलीक महाराज देहूकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. १९ रोजी रात्री ९ वाजता हभप श्री गुरुराज महाराज देगलुरकर यांचे तर शुक्रवार दि. २० रोजी पंढरपुर येथील हभप श्री गोपाळअण्णा महाराज वासकर यांचे किर्तन पार पडणार आहे. शनिवार दि. २१ रोजी सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान हभप गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन तर रात्री ९ वाजता (पान २ वर)



## मांजरा कारखाना कर्मचारी सांस्कृतिक भवनाचे भूमिपूजन

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर, दि.१३- विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्थेकडून कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन माजी मंत्री कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १२) करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोक काळे, शेतकी कमिटीचे अध्यक्ष कैलास पाटील, संचालक मदन भिसे, अनिल दरकसे, सचिन शिंदे, माजी संचालक साजिद बाबामीया पटेल, गुरुनाथ गवळी, कार्यकारी संचालक पंडित देसाई, पतसंस्थेचे चेअरमन शरद साळुंखे, सचिव विनयकुमार टमके, पतसंस्थेचे पदाधिकारी, अर्क शाळा प्रमुख योगेश देशमुख, सहाय्यक शेतकी अधिकारी ए. पी. पवार, कोजन मॅनेजर दळवी, (पान २ वर)

# एकत्रिकरणाचं भवितव्य

ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे.

२८जानेवारीच्या सकाळी बारामतीत दुर्दैवी विमान अपघात झाला नसता, त्यात अजितदादा पवार यांचं निधन झालं नसतं, तर आज कदाचित सर्व वृत्तपत्रांत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या बातम्यांचे मथळे असते. 'कदाचित' म्हणण्याचं कारण एवढंच, की दिशा निश्चित होती; पण प्रक्रियेचे तपशील ठरत होते. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असल्याने काही तांत्रिक बाबी आडव्या येऊ शकल्या असत्या. शिवाय, राजकीय घडामोडींत कधी कोणते फाटे फुटतील, हे सांगता येत नसतं. त्यामुळे, एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत नाही, तोपर्यंत त्याबाबत खात्रीने बोलण्याला काही अर्थ नसतो. 'घड्याळ'वाल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते 'अशी काही चर्चा सुरू असल्याचं आम्हाला माहीत नव्हतं. तसं असतं, तर दादा आमच्याशी बोलले असते' असं सुरुवातीला म्हणाले. पण, त्यानंतर संबंधितांकडून चर्चेच्या फेऱ्यांचे अनेक तपशील, चित्रफितीच दाखवल्या गेल्याने या नेत्यांकडून पुन्हा तशा प्रकारचं वक्तव्य झालं नाही. आता उघड झालेल्या एकूण तपशिलावरून अशी चर्चा सुरू होती आणि खुद्द अजितदादाच त्यासाठी आग्रही होते, असं दिसतं. या चर्चेतील खाचाखोचा ते आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना किती सांगत असतील, हा प्रश्न आहे. कारण, ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड, पदग्रहणापूर्वीचे सोपस्कार, दिल्ली भेटीसाठीचा आग्रह या वारसदारांना समजत नाही, असं नाही. पण, आत्ताच काही भूमिका जाहीर करण्याची गरज नाही. सगळ्यांचं ऐकून, प्रत्येकाची पावलं कुठे पडतात हे नीट समजावून घेऊन मगच आपली भूमिका स्पष्ट करण्याचं त्यांनी ठरवलं असावं. कुठेही काहीही न बोलता सरकारमधील, पक्षातील; अगदी पक्ष संघटनेतील घडी बसवण्याला त्यांनी प्राधान्य दिलेलं दिसतं. आजच्या घडीला हेच धोरण योग्य आहे. अजितदादांचे वारसदार नवखे किंवा अपरिपक्व आहेत, त्यांना आपल्यालाच पुढे घेऊन जायचं आहे, असा समज कोणी करून घेतला असेल, तर त्यांना लवकरच ठेच लागण्याची शक्यता यावरून दिसते. दोन राष्ट्रवादी वेगळ्या झाल्या, तेव्हांही त्याबाबतच्या चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर कितीतरी दिवस सुरू होत्या. तेव्हांही पक्षात आणि पवार कुटुंबात अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतंत्रपणे बोलणी होत होती. दोन्ही बाजूला अग्रभागी पवार कुटुंबातील व्यक्तीच असल्याने साहजिकच त्यावेळीही 'केवळ पक्षात फूट, की कुटुंबात दरी?' अशा प्रकारच्या चर्चा झाल्या होत्या. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्यासाठी जे आग्रही होते, त्यातील प्रत्येकाची त्या आग्रहामागे वेगवेगळी कारणं होती. त्याची चर्चाही त्यानंतर पुष्कळ झाली होती. पण, तो निर्णय घेण्याच्या काळात स्वतः अजितदादा किती तणावात होते, याची कल्पना भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह राजकीय वर्तुळालाही आहे. दोन राष्ट्रवादी स्वतंत्र झाल्यानंतरही सुरुवातीचे काही महिने सोडले, तर नंतर दोन्ही बाजूंनी परस्परांवरचे वार थांबले होते. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात दोन्ही पक्षांचे नेते आणि आमदार किती समन्वयाने वावरायचे, हे तर जगजाहीर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांनी अनेक ठिकाणी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना त्याची कल्पनाही दिली होती. भाजपसारख्या तगड्या पक्षाच्या युतीत असताना त्यांच्या संमतीशिवाय असा काही निर्णय कोणी पक्ष परस्पर घेईल, हे संभवत नाही. म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने केलेली निवडणूक आघाडी ही भाजपला पूर्ण अवगत होती आणि त्यांची त्याला मूळ संमती होती, असं मानायला जागा आहे. भाजपचं केंद्रीय नेतृत्व राजकीय परिणामांचा विचार केल्याशिवाय आणि एखाद्या राजकीय घडामोडीचं पूर्ण तार्किक चित्र स्पष्ट असल्याशिवाय गाफीलपणे परवानगी देणंही शक्य वाटत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींची माहिती महायुतीतल्या अन्य पक्षांच्या वरिष्ठ वर्तुळात असणार असा निष्कर्ष यावरूनच काढला जातो आहे. राष्ट्रवादीतल्या नेत्यांनी याही गोष्टीचा विचार उघड वक्तव्य करण्याआधी करायला हवा. अर्थात यावि‍षयी आता कोणी उघड कबुली देण्याचा किंवा दुजोरा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण, त्या अपघाताने सर्व समीकरणंच बदलून गेली आहेत. एकत्रिकरणाचा विचार करणारे आपापला विचार करताहेत; पण हे एकत्रिकरण ज्या राजकीय चित्राचा भाग होतं, त्या चित्रातल्या अनेक घटकांची आताच्या घडीची गरज, सोय काय आहे, याचा विचार कोणी करतं आहे, असं दिसत नाही. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली भेटीतही या विषयावर चर्चा झाल्याचं काही ठिकाणी प्रसिद्ध झालं आहे. त्याचे तपशील एक - दोन दिवसात कळतील. जर चर्चा झालीच असेल, तर बदललेल्या परिस्थितीत भाजपची भूमिका काय आहे, त्यांचा कल कुठे आहे, हे तिथे उपस्थित असलेल्यांना कळलंच असेल. राष्ट्रवादीतले प्रमुख चार-पाच नेते या एकत्रिकरणाला जो विरोध करताहेत, त्याची दखल भाजप कशी घेणार आहे, यावरच या 'चर्चेतल्या एकत्रिकरणा'चं भवितव्य अवलंबून आहे. अजितदादा या एकत्रिकरणाला तयार होते, त्यामागे राजकीय कारणांपेक्षा भावनिक कारणं जास्त होती, असं म्हणतात. ती भावनिक कारणं त्यांच्या वारसांच्या दृष्टीने किती महत्त्वाची ठरतात, हा मुद्दा आहेच. शिवाय, ही प्रक्रिया नेटाने पुढे नेण्याएवढी तीव्र इच्छाशक्ती आता कुणाकडे असण्याचं कारण नाही, ही वस्तुस्थितीही लक्षात घ्यावी लागेल. आधी कुटुंब; मग पक्ष याच क्रमाने ही दुरुस्ती व्हायची तेव्हां होईल.

# सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान ;मधुबाला

आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मर्लिन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९३ वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५७ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# पूरग्रस्त भागातील सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची केंद्रीय पथकाकडून पाहणी



धाराशिव (प्रतिनिधी) - २०२५ मधील अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती नंतरच्या गरजांचे मूल्यांकन (PDN) करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या तज्ज्ञांचे पथक केंद्रीय पथक प्रमुख सी.पी. मोहन यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात दाखल झाले. या पथकाने बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी करत शेतकरी व ग्रामस्थांच्या वेदना जाणून घेतल्या व सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची पाहणी दि.१२ फेब्रुवारी रोजी केली.

भूम तालुक्यातील चिंचपूर (ढगे) जवळ मोहन यांनी भारत मोरे,चंद्रकांत मोरे व अमरसिंह ढगे यांच्या शेतीची पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करून सविस्तर माहिती घेतली. पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे पिके, शेती जमीन आणि बांधबंदिस्तीचे झालेले नुकसान पाहून त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. बाधित शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती मोहन यांना दिली. यावेळी भूम उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे, तहसिलदार जयवंत पाटील, तालुका कृषी अधिकारी अतुल ढवळे, मंडळ अधिकारी प्रवीण पारखे व ग्राम महसूल अधिकारी एस.के. खोत यांचु प्रामुख्याने उपस्थिती होती. चिंचपूर येथील कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा व वालवड येथील पाझर तलावाचे पुरामुळे झालेले नुकसानही पथकाने पाहिले. पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता मदने यांनी झालेल्या नुकसानीची माहिती दिली. तसेच बेलगाव येथील विश्वनाथ दातखिळे यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या १८ गायी पुरात मृत्युमुखी पडल्या तर २० बकऱ्या पुराच्या पाण्यात वाहून गेल्या. जनावरांचा चारा, दूध काढण्याची मशीन, गोठा, शेणखत व कडबा कटरही पुरामुळे वाहून गेल्याची व्यथा दातखिळे यांनी पथकासमोर मांडली. या घटनेमुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबावर कोसळलेले दुःख आणि उपजीविकेवर आलेले संकट प्रकर्षाने समोर आले. तर परंडा तालुक्यातील आवार पिंपरीलाही केंद्रीय पथकातील सदस्य आशा राणी व मिकी मेकॉन डलबेरा यांनी भेट दिली. गावाजवळून वाहणाऱ्या उल्फा नदीला आलेल्या पुरामुळे नुकसान झालेल्या शाळा, अंगणवाडी इमारत व ग्रामपंचायतीच्या आरओ प्लांटची पाहणी करून त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक शहाजी गावटे, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. यावेळी तहसिलदार निलेश काकडे, गट विकास अधिकारी विनोद जाधव, प्रभारी गट शिक्षणाधिकारी हाके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर मोहन यांनी परंडा विश्रामगृहात तलावातून मासेमारी करणाऱ्या मासेमारी बांधवांशी चर्चा करून झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. दरम्यान, सकाळी ९.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी जिल्ह्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे शेती पिके, शेती जमीन, पशुधन, रस्ते, सार्वजनिक मालमत्ता तसेच खाजगी मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीची सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे पथकास दिली.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष यांच्यासह विविध विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. हे तज्ज्ञ पथक जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील नुकसानीचा सखोल आढावा घेऊन सविस्तर PDN अहवाल तयार करणार असून तो केंद्र सरकारकडे सादर करण्यात येणार आहे. अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना त्यामुळे दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

## पान १ वरून

### जपानसोबतचे...

दोन वेळा झालेल्या जपान दौऱ्यादरम्यान वाकायामा आणि कोयासन येथे भेट दिल्याच्या आठवणी सांगून कोयासन विद्यापीठात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले, हे दोन्ही देशांतील मैत्रीचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. २०२३ मध्ये वाकायामाचे दिवंगत राज्यपाल यांच्या उपस्थितीत सुमो पहेलवानांचा संघ मुंबईत आला होता. गेटवे ऑफ इंडिया परिसरात सुमो आणि भारतीय कुस्तीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, ज्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याची आठवण त्यांनी सांगितली. सध्या जपानचे सुमो पहेलवान पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात प्रशिक्षण घेत आहेत. या क्रीडा क्षेत्रातील देवाणघेवाणीमुळे दोन्ही देशांना उत्कृष्ट खेळाडू घडविण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जपानचे दिवंगत पंतप्रधान शिंजो आबे यांची आठवण करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, त्यांनी भारताशी मैत्री अधिक दृढ केली. त्यांच्या कार्यकाळात मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू झाले. मुंबईत ४० कि.मी. लांबीची भूमिगत मेट्रो, २२ कि.मी. लांबीचा देशातील सर्वात मोठा समुद्री पूल उभारण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

नागपूर येथे बामियानच्या बुद्ध पुतळ्याची प्रतिकृती उभारणार

अफगाणिस्तानातील बामियानच्या गौतम बुद्धांच्या पुतळ्याच्या विध्वंसाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथे त्या पुतळ्याची प्रतिकृती उभारण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यपालांना दिला. नागपूर शहर डॉ.आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारून पुनरुज्जीवन घडवून आणलेले ऐतिहासिक ठिकाण आहे. या उपक्रमातून जगाला शांततेचा संदेश जाईल आणि भारत-जपान मैत्रीचे प्रतीक निर्माण होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. विविध क्षेत्रातील शिष्टमंडळाने मुंबईस भेट दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी 'अरिगातो गोझायमास' असे जपानी भाषेत आभार मानले.

### रिलायन्सला मिळाला...

यामुळे व्हेनेझुएलाचे स्वस्त तेल शुद्धीकरणासाठी मोठ्या प्रमाणात भारतात येण्याची शक्यता आहे. शुद्धीरणानंतर हे तेल भारतात तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात विक्रीसाठी जाईल. यामुळे भारतातील इंधनाचे दर कमी होण्याची शक्यता आहे.

व्हेनेझुएलातून भारतापर्यंत कच्च्या तेलाचा पुरवठा विना अडथळा सुरू ठेवण्यासाठी नियोजन सुरू आहे. एप्रिल २०२६ पासून व्हेनेझुएलाचे तेल मोठ्या प्रमाणात शुद्धीरणासाठी भारतात येणार आहे. सूत्रांच्या मते व्हेनेझुएलाच्या कच्च्या तेलामुळे रिलायन्सला मोठा आर्थिक फायदा अपेक्षित आहे.

### डिझेल गाड्या...

उद्योग : ऑटोमोबाईल कंपन्यांना आता बॅटरी निर्मितीसोबतच हायड्रोजन आणि बायोगॅस तंत्रज्ञानावर गुंतवणूक करावी लागेल.

### विमानात मोठ्या...

त्यांनी स्पष्ट केले की बेशिस्त प्रवाशांना रोखण्यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने ( DGC ) जारी केलेल्या 'नागरी विमान वाहतूक आवश्यता' यानुसार ही कारवाई केली जाईल

विमान नियम १९३७ च्या अंतर्गत तरतुदी

नियम २२ : नियमानुसार, जर एखादा प्रवासी सुरक्षा किंवा शिस्तीचे उल्लंघन करत असेल, तर विमान कंपनी त्या प्रवाशाला विमानात प्रवेश नाकारू शकते किंवा विमानातून उतरवूही शकते

नियम २३ : हा नियम 'पायलट - इन - कमांड' यांना विशेष अधिकार देतो. विमानाची सुरक्षा किंवा शिस्त धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही प्रवाशांविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्याचे अधिकार वैमानिकाकडे असतात.

नियम २९ : वरील नियमांचे उल्लंघन केल्यास प्रवाश्यांसाठी विशिष्ठ शिक्षेची आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

### मंत्रालयात लाच...

कार्यालयात अँटी करप्शन ब्युरोचे सहा अधिकारी पोहोचले होते. कारवाई करताना झिरवाळ यांचं कार्यालय पूर्ण ताब्यात घेतले. तपास झाल्यानंतर मग या संबंधित लिपिकाला ताब्यात घेतले. त्यानंतर कार्यालय उघडण्यात आले.

### विजय मल्ल्या ...

असे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने गुरुवारी स्पष्ट केले.

भारतीय बँकांचे हजारो कोटी बुडवून परदेशात पसार झालेल्या विजय मल्ल्याला ब्रिटनहून भारतात परत आणण्याची प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. त्याने या कायदेशीर प्रक्रियेचा ब्रिटनमधील कोर्टात गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही याचिका फेटाळून लावावी, अशी मागणी केंद्र सरकारतर्फे न्यायालयाकडे केली. १८ फेब्रुवारीच्या पुढील सुनावणीत फरार मल्ल्या भारतात परत कधी येणार?याची माहिती त्यांच्या वकिलांना सादर करण्याचे निर्देश जारी केले.

### फेब्रुवारीत 'या दिवशी'...

दक्षिणेकडे मात्र परिस्थिती वेगळी आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेली कमी दाबाचा पट्टा तीव्र होण्याची शक्यता असून त्याचा परिणाम तामिळनाडू आणि केरळ राज्यांवर होऊ शकतो. काही भागांत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

राज्यातील शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानातील बदल लक्षात घेऊन शेतीची कामे नियोजनपूर्वक करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. ढगाळ वातावरणामुळे काही पिकांवर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे आवश्यक ती काळजी घेण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

### अंतराळ संशोधन...

जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांचा प्रवास विमानाने होणार असून त्यांच्या सुरक्षित व सुसूत्र प्रवासाची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट दर्जाची निवास व्यवस्था करण्यात आली असून दररोज आवश्यक सर्व सुविधा व साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली आहे. असा उपक्रम विभागामार्फत पहिल्यांदाच राबविण्यात येत आहे.

९८० शाळांतून निवडलेले १०० गुणवंत विद्यार्थी:

- राज्यातील ९८० विजाभज आश्रमशाळांमधून इयत्ता ९ वी व ११ वीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता परीक्षा घेण्यात आली. त्यातून ५० विद्यार्थी व ५० विद्यार्थीनी अशा एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

सहलीचे नियोजन:

विद्यार्थी १५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत पुणे, बेंगलुरू, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी या शहरातील विविध ठिकाणांना भेटी देणार आहेत.

- १५ फेब्रुवारी रोजी पुणे - पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क व नॅशनल वॉर मेमोरियल येथे भेट. १६ फेब्रुवारी पुणे - भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था येथे प्रयोगाधारित विज्ञान कार्यशाळा व शास्त्रज्ञांशी संवाद.

- १६ फेब्रुवारी रोजी पुणे विमानतळावर मंत्री अतुल सावे व विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून इस्त्रो दौऱ्यासाठी हिरवी झेंडी दाखवणार आहेत.

- १७ फेब्रुवारी बंगळुरू विश्वेश्वरय्या औद्योगिक व तंत्रज्ञान संग्रहालय, हिंदुस्तान विमान निर्मिती वारसा संग्रहालय व लालबाग वनस्पती उद्यान भेट.

- १८ फेब्रुवारी तिरुवनंतपुरम (थुंबा) - भारतीय अंतराळ संशोधन संस्था केंद्र, उपग्रह प्रदर्शन विभाग व प्रक्षेपण तंत्रज्ञान गॅलरी भेट; रॉकेट प्रक्षेपणाचे अवलोकन. तसेच नेपियर संग्रहालय व कोवलम समुद्रकिनारा भेट.

- १९ फेब्रुवारी कन्याकुमारी - पद्मनाभपुरम राजवाडा, विवेकानंद शिला स्मारक, तिरुवल्लुवर पुतळा, गांधी स्मारक तसेच सूर्यास्त दर्शन.

### सलग दुसऱ्या...

२९ जानेवारी रोजी, चांदीने प्रति किलो ४.२० लाख रुपयांचा विक्रमी उच्चांक गाठला, तर सोन्याने १.९३ लाखांपर्यंत उसळी मारत २ लाखांच्या जवळ झेप घेतली होती. मात्र आता सोनं आणि चांदी दोन्ही त्यांच्या विक्रमी उच्चांकावरून लक्षणीयरीत्या घसरले आहेत.

### सिध्देश्वर यात्रा...

हभप विजयानंद महाराज सुपेकर यांचे किर्तन पार पडणार आहे. रविवार दि. २२ रोजी सकाळी ११ ते ४ या दरम्यान १००१ महिलांच्या उपस्थितीत श्रीस रुद्राभिषेक करण्यात येणार आहे. तसेच यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजनही केलेले आहे. याच दिवशी रात्री ८ वाजता शिवरुद्र स्वामी यांची संगीत भजनी होणार आहे. सोमवार दि. २३ रोजी सचिन जाधव व वैष्णवी बरकते यांचे तरे मंगळवार दि. २४ रोजी लातूर येथील संतोष थोरात यांचे संगीत भजन पार पडणार आहे. बुधवार दि. २५ रोजी डॉ. दत्ता राजे यांचे संगीत भजन होणार असून गुरुवार दि. २६ रोजी सकाळी ११ वाजता कृषी पदर्शनाचे उद्घाटन पार पडणार आहे. याच दिवशी देवस्थान परिसरात पशु व पक्षी पदर्शनाचे उद्घाटन होणार असून यावेळी उत्कृष्ट पुश व पक्षींची निवड स्पर्धा पार पडणार आहे. या दिवशी रात्री ८ वाजता विठ्ठलराव जगताप यांचे संगीत भजन होणार आहे.

शुक्रवार दि. २७ रोजी सकाळभ ११ वाजता पशु अश्व व श्वान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी उत्कृष्ट पशु, अश्व व श्वान यांची निवड होणार आहे. या स्पर्धेत निवड झालेल्या पशुंना लातूर बाजार समितीच्या वतीने चांदीचा रथ देण्यात येणार असून पशु मालकास प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे. शनिवार दि. २८ रोजी लातूर येथील सुरमणी भुजंग मुर्के तर रविवार दि. १ मार्च रोजी श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम संपन्न होणार आहे. रविवार दि. १ मार्च रोजीच देवस्थान परिसरात सकाळी ११.३० पासून कुस्ती स्पर्धांचा फड रंगणार आहे. सोमवार दि. २ मार्च रोजी रात्री ८ वाजता उपविभागीय अधिकारी रोहिणी नजहे यांच्या उपस्थितीत शोभेच्या दारुची आतिषबाजी करून यात्रा महोत्सवाचा समारोप होणार आहे. तसेच याच दिवशी रात्री ९ ते ११ पंडरपुर येथील हभप माधव महाराज शिवणीकर यांचे काल्याचे किर्तन पार पडणार असून यानंतर श्रीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच दहीहंडी व महाप्रसादाचे आयोजन यावेळी करण्यात आलेले आहे.

यात्रा महोत्सव १५ दिवस पार पडणार असून यासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. यावर्षी यात्रा महोत्सवात भाविकांसह नागरिकांसाठी विविध आकर्षण राहणार असून आनंद मेळा यासह देवस्थान परिसरात विविध खाद्यपदार्थ व साहित्यांचे स्टॉलही असणार आहे. या यात्रा महोत्सवात लातूर व परजिल्ह्यासह परराज्यातील नागरिक व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासक सचिन जांबूतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, श्रीनिवास लाहोटी, प्रदीप राठी, मन्मथ लोखंडे, बाबासाहेब कोरे, अशोक भोसले, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह बिसेन, चंद्रकांत परदेशी व व्यंकटेश हालिंगे यांनी केले आहे.

रक्तदात्यास थेट दर्शन यात्रा महोत्सवानिमित्त लातूर येथील डॉ. भालचंद्र ब्लड बँकेच्या वतीने देवस्थन परिसरात महाशिवरात्री दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. महाशिवरात्री दिवशी श्री सिध्देश्वराच्या दर्शनासाठी भाविक व नागरिकांची मोठी गर्दी असते त्यामुळे रक्तदान शिबिरात रक्तदान केलेल्या दात्यास थेट दर्शनाचा लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे या शिबिरात अधिकाधिक भाविकांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मांजरा कारखाना..

खाते प्रमुख व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. मांजरा साखर कारखान्याच्या शेती विभागातील फिल्डवर कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना याच कार्यक्रमात मोटार सायकलचे वाटप माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# काँग्रेस नगरसेवकांचे सर्वसाधारण सभेपूर्वी आंदोलन

## नळदुर्ग शहरात घाणीचे साम्राज्य



नळदुर्ग (प्रतिनिधी) – नळदुर्ग शहरामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसून येत आहे. स्वच्छतेची योजना ही फक्त गुत्तेदार जगविण्यासाठी आहे का ? हजेरी दाखवा, पैसे घ्या याला जबाबदार कोण ? म्हणत काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी घनाघात करत सत्ताधाऱ्याला वेठीस धरले. तर घनकचरा व्यवस्थापन समितीकडे नळदुर्ग नगर प्रशासनाचे अक्षम दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

याबाबत नगर परिषदेस वेळोवेळी निवेदन देऊन सुद्धा नगराध्यक्ष बसवराज धरणे व मुख्याधिकारी यांनी हा महत्त्वाचा विषय लक्षात न घेता त्यांनी चक्क या विषयाकडे कानाडोळा करत दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे सर्वसाधारण सभेच्या पूर्वी काँग्रेसच्या नगरसेवकांनी प्रशासनाचा निषेध करीत नगरपालिकेसमोर बॅनर हातात घेत घोषणाबाजी करीत नगराध्यक्ष व प्रशासनाचे लक्ष वेधले. आंदोलनानंतर ते आंदोलक नगरसेवक सर्वसाधारण सभेसाठी नगर परिषदेच्या सभागृहात रवाना झाले.

घनकचरा व्यवस्थापन भ्रष्टाचार मुक्त झाले पाहिजे यासाठी नळदुर्ग शहर काँग्रेसच्या नगरसेवकाने हातात फलक घेऊन हे घनकचरा व्यवस्थापन टेंडर रद्द करण्यात यावे अशी मागणी केली आहे. यावेळी नळदुर्ग शहरातल्या अनेक विषयावरती अनेक विकास कामे संदर्भात महत्वपूर्ण चर्चा केली. परंतू निवेदनाला प्रशासनाकडून व नगराध्यक्ष यांच्याकडून केराची टोपली दाखवली आहे. सर्वत्र पसरलेला घाणीच्या साम्राज्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्यामुळे त्या घनकचरा व्यवस्थापन समितीतील सर्व सफाई कामगार असून अडचण नसून खोळंबा या प्रमाणे कर्मचारी कामे करतात. कागदावर मजुराची टिप्पणी करून पैसे हडप करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी. तसेच त्याचे टेंडर रद्द करावे,

शहरातील खड्डे पडल्याने वाहतूक कोंडी होत आहे. आर ओ प्लॅन्ट बसवून ४ वर्ष झाले ते आज देखील धुळखात पडून आहे. विशेष म्हणजे शहरामध्ये जिकडे तिकडे घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. खरंतर घनकचरा व्यवस्थापन समितीच्या कर्मचाऱ्यांनी काम करायला हवे होते. परंतू फक्त गुत्तेदाराची पैसे उचलण्यामध्ये चिकाटी असल्याने स्वच्छतेच्या कामाकडे दुर्लक्ष होत आहे. यावेळी दिवाबत्ती लावा आणि अंधार दूर करा, घनकचरा टेंडर रद्द करा आदींसह विविध प्रकारच्या गगणभेदी घोषणा देत आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पक्षाचे गटनेते मारुती खारवे, उपनेते आकाश कुलकर्णी, नगरसेवक इमाम शेख, सुधीर पोतदार, गफूर कुरेशी, नगरसेविका अपर्णाताई बेडगे, मुन्नाबी कुरेशी, कमलताई गायकवाड आदींनी आंदोलन करून सर्वसाधारण सभेसाठी सभागृहात रवाना झाले.

# पाऊण कोटींची अवैध अफूची झाडे जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची दमदार कामगिरी



धाराशिव (प्रतिनिधी) – शेतकरी सतत आर्थिक संकटात सापडत असल्यामुळे तो या नैसर्गिक कचाट्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे झटपट पैसा मिळावा यासाठी तो प्रयत्नशील असतो. त्यासाठीच एका शेतकऱ्याने त्याच्या कांद्याच्या पिकामध्ये चोरुन व कोणालाही संशय येऊ नये याची खबरदारी घेत चक्क अफूच्या झाडांची लागवड करण्याची अफलातून शक्कल लढवली. मात्र, त्याची कुजबुज परिसरातील लगतच्या शेतकऱ्यांमध्ये होऊ लागल्याने त्याचा सुगावा अर्थात वास पोलिसांना लागलाच. त्यामुळे पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन धाड टाकीत शेतातून पांढरी व गुलाबी रंगाची फुले तसेच मोठी बोंडे असलेली ४८५ किलो ६५ ग्रॅम वजनाची अफूची झाडी जप्त केली. त्याची किंमत ७२ लाख ८४ हजार ७५० रुपये आहे. ही दमदार कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दि.११ फेब्रुवारी रोजी केली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वाशी तालुक्यातील दसमेगाव येथील समाधान मनोहर उघडे यांनी त्यांच्या शेत गट क्रमांक ६३ मध्ये लपून अफूची लागवड केली असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यामुळे पुढील कायदेशीर कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि विनोद इज्जपवार यांनी तात्काळ सपोनि सुदर्शन कासार व पथकास आदेशित केले. मिळालेल्या बातमीची खात्री करण्यासाठी

शेती गट क्रमांक ६३ ला भेट दिली असता तेथे कांद्याच्या आंतर पिकात मोठ्या प्रमाणात अफूची लागवड केली असल्याचे दिसून आले. त्या अफुच्या झाडांना पांढरी व गुलाबी रंगाची फुले तसेच मोठी बोंडे असल्याचे दिसून आले. ते शेत हे समाधान मनोहर उघडे यांचे असून त्यांनीच ती अफुची लागवड केली असल्याचे आजूबाजुच्या शेतकऱ्यांनी सांगितले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये समाधान उघडे यांच्या शेतातून एकूण ४८५.६५ किलो वजनाची पांढरी व गुलाबी रंगाची फुले तसेच मोठी बोंडे असलेली अफूची झाडे वाशीचे नायब तहसिलदार किसन सांगळे व दोन शासकीय पंच यांच्या उपस्थितीत जप्त करण्यात आली. तर सपोनि सुदर्शन कासार यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून शेतकरी उघडे यांच्या विरोधात विना परवाना, स्वतःच्या फायद्यासाठी अफूची लागवड केली असल्याची तक्रार दिली. दिलेल्या तक्रारीवरून उघडे यांच्यावर वाशी पोलीस ठाण्यात गुरनं ४५/२०२६ क ८ (क) सह १८ एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही दमदार कामगिरी पोलीस अधीक्षक रितू खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी आयपीएस पोलीस अधिकारी आय.एन. मेघना, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, पोलीस हवालदार शौकत पठाण, जावेद काझी, दत्तात्रय राठोड, दयानंद गादेकर, पोलीस नाईक अशोक ढगारे, चालक पोलीस हवालदार सुभाष चौरे, चालक पोलीस हवालदार नागनाथ गुरव व वाशी पोलीस ठाण्याचे सपोनि यशवंत घोडके, पोलीस हवालदार बोरकर, जगताप, मिसाळ, खैरे व घुले यांच्या पथकाने केली आहे.

# खरीप विमा रक्कमेस मान्यतेमुळे शेतकऱ्यांच्या चिकाटीचा व संघटित लढ्याचा विजय - आ. कैलासदादा

धाराशिव (प्रतिनिधी) – खरीप हंगाम २०२० मधील पीक विम्याचे १३४.११ कोटी रुपये पात्र शेतकऱ्यांना वितरित करण्यास राज्य शासनाने अखेर मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना हेक्टरी ९ हजार रुपये विमा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा निर्णय म्हणजे दीर्घकाळ चाललेल्या न्यायालयीन आणि रस्त्यावरच्या संघर्षाचा मोठा विजय असल्याची माहिती आ कैलास पाटील यांनी दिली आहे.

खरीप हंगाम २०२० दरम्यान राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले होते. जिल्ह्यातील शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त झाले होते. मात्र, विमा कंपनीने नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ केली होती. शेतकऱ्यांच्या हक्काचा पीक विमा मिळावा यासाठी आपण आमरण उपोषण आंदोलन पुकारले होते. प्रशासनाला जागे करण्यासाठी शेतकऱ्यांसह, शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरून तीव्र लढा उभारला होता. या संघर्षामुळे पात्र शेतकऱ्यांची संख्या १ लाख ६९ हजार ८६ वरून तब्बल ३ लाख ५३ हजार ४९९ इतकी वाढली होती. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विमा कंपनी विरोधात अवमान याचिका



दाखल करून त्यांचे बँक खाते गोठविण्याचे आदेश दिले होते. हा शेतकऱ्यांच्या लढ्याचा पहिला टप्पा होता. न्याय मिळवण्यासाठी मा. उच्च न्यायालयात शेतकऱ्यांच्या माध्यमातून जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. दि. ६ मे २०२२ रोजी मा. उच्च न्यायालयाने पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, विमा कंपन्यांनी या आदेशालाही विरोध केला. राज्य मंत्रिमंडळाने खरीप २०२० चा दुसरा हप्ता व रब्बी २०२०-२१ साठीची प्रीमियम सबसिडी स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाविरोधात बजाज अलियांज इन्शुरन्स कंपनीने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्या. मात्र दि. ५ सप्टेंबर २०२२ व दि. ३० सप्टेंबर २०२२ रोजी त्या फेटाळण्यात आल्या. त्यानंतर संभाजीनगर खंडपीठात रिट याचिका दाखल करण्यात आली. मा. उच्च न्यायालयाने ७५ कोटी रुपये व त्यावरील १७ कोटी रुपये व्याज शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी राज्य सरकारकडे जमा करण्याचे आदेश दिले. तरी देखील विमा कंपनीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन वाटपाला स्थगिती मिळवली. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडील विमा हप्त्याचा दुसरा भाग थेट पात्र शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी वापरण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार राज्य शासनाने १३४.११ कोटी रुपये वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या चिकाटीचा आणि संघटित लढ्याचा विजय आहे. हा लढा केवळ पैशांसाठी नव्हता, तर शेतकऱ्यांच्या सन्मानासाठी होता. नैसर्गिक आपत्तीने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी न्यायालयात फिरवत ठेवणे ही अत्यंत दुर्दैवी बाब होती. पण शेतकरी खचला नाही, झुकला नाही. रस्त्यावरचा संघर्ष आणि न्यायालयीन लढा यांचा संगम घडवून हा ऐतिहासिक निर्णय मिळवण्यात यश आले आहे. खरीप २०२० मध्ये नुकसान झालेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीक विमा भरपाई मिळावी त्यात कोणतीही दिरंगाई होऊ नये, अशी माहिती आ पाटील यांनी दिली आहे.

# खरीप २०२० पीक विम्याचे पैसे मिळण्यासाठी महत्वाचे पाऊल : आ. राणादादा

धाराशिव (प्रतिनिधी) – खरीप २०२० हंगामातील पीक विम्याच्या प्रतीक्षेत असलेल्या जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांचा अखेर विजय झाला आहे. जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काच्या लढ्याला निर्णायक यश मिळाले आहे. आपल्या महायुती सरकारने १३४ कोटी ११ लाख ९१ हजार ९३८ रुपये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यास अंतिम मान्यता दिली आहे. मा . सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ही रक्कम जमा केली जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

खरीप २०२० मध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. मात्र, तांत्रिक कारणांमुळे विमा कंपन्या नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करत होत्या. या विरोधात मी शेतकऱ्यांच्या सहकार्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने २४ नोव्हेंबर २०२५ आणि १८ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण आदेशानुसार, विमा कंपनीचा दुसरा हप्ता रोखून तो थेट शेतकऱ्यांना देण्याचे निर्देश दिले होते. याच आदेशाची अंमलबजावणी करत, आपल्या महायुती सरकारने दि. ११ फेब्रुवारी रोजी शासन निर्णय जारी केला आहे. १३४.११ कोटींचा हा निधी कृषी आयुक्तालयाच्या एडउठजथ बँक खात्यातून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना वर्ग केला जाणार आहे. बजाज अलियांज विमा कंपनीने न्यायालयात जमा केलेले ७५ कोटी रुपये आणि त्यावरील व्याजही पात्र शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी वापरले जाणार आहेत. त्याची सुनावणी उद्या न्यायालयात होणार आहे. त्याकडेही आपले लक्ष असून त्याबाबतही सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे. जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांच्या हक्कासाठी माझा सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरूच आहे.

मागील पाच वर्षांपासून आपण शेतकऱ्यांच्या सोबतीने सलग जिल्हा प्रशासनाकडे आणि न्यायालयात पाठपुरावा करत होतो. अगदी सर्वोच्च न्यायालयानेही विमा कंपनीची याचिका फेटाळल्यामुळे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीक विम्याचा मार्ग मोकळा झाला होता. आता प्रत्यक्ष निधी वर्ग करण्याचा शासन निर्णय निघाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे आ पाटील यांनी नमूद केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात जागतिक युनानी दिवस साजरा

धाराशिव (प्रतिनिधी) – हकीम अजमल खान यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा रुग्णालयात जागतिक युनानी दिवस दि.१२ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात आला. दरम्यान, जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही विशिष्ट उपचारपद्धती किंवा आजाराबाबत अधिक माहिती हवी असल्यास जिल्हा रुग्णालयातील आयुष विभागाशी संपर्क साधून या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.तानाजी लाकाळ यांनी केले आहे.

जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुष विभागातील युनानी तज्ज्ञ डॉ.अबरार अहेमद देशमुख यांनी हकीम अजमल खान हे स्वातंत्र्यसैनिक, प्रख्यात युनानी चिकित्सक, शिक्षक आणि समाजसुधारक होते. त्यांनी युनानी चिकित्सा प्रणालीला वैज्ञानिक दृष्टिकोनातून विकसित करून तिचे महत्त्व देश-विदेशात पोहोचविले असल्याचे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले. तर डॉ.शिवाजी फुलारी यांनी युनानी औषध पद्धतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करीत

युनानी वैद्यक ही ग्रीक, अरबी आणि भारतीय संस्कृतींच्या संगमातून विकसित झालेली पारंपरिक आणि प्राचीन उपचार पद्धती असल्याचे नमूद केले. तर शरीरातील रक्त, कफ, पित्त आणि काळे पित्त या चार द्रव्यांच्या संतुलनावर आरोग्य अवलंबून असते, असा युनानी तत्त्वज्ञानाचा मूलभूत सिद्धांत असल्याचे त्यांनी सांगितले. या द्रव्यांमध्ये असमतोल निर्माण झाल्यास रोग उद्भवतात. त्यामुळे नैसर्गिक औषधे, वनस्पती, योग्य आहार आणि संतुलित जीवनशैली यांना युनानी उपचार पद्धतीत विशेष महत्त्व दिले जाते, असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे भारतामध्ये युनानी वैद्यकाला आयुष मंत्रालयामार्फत विशेष प्रोत्साहन दिले जात आहे. तर देशभरात अनेक रुग्णालये व दवाखान्यांमध्ये युनानी उपचार उपलब्ध असून त्वचारोग, सांधे दुखी, पचन विकार तसेच दीर्घकालीन आजारांवर ही पद्धत प्रभावी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच युनानी दिवस साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे या प्राचीन व नैसर्गिक उपचार पद्धतीबाबत जनजागृती करणे हा आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी संतुलित आणि नैसर्गिक जीवन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

# धाराशिवचे पुत्र पोलीस उपनिरीक्षक अराफत सिद्दीकी यांचा मुंबईत डंका

## धडाकेबाज कामगिरीबद्दल पोलीस उपायुक्तांच्या हस्ते विशेष गौरव



धाराशिव (प्रतिनिधी) – धाराशिव शहरातील रहिवासी तसेच धाराशिव शहर छेडछाड पथकातील पोलीस कर्मचारी व सध्या मुंबई येथे Exterment विभागात पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले अरफत सिद्दीकी यांनी गुंडगिरी मोडून काढण्यासाठी केलेल्या धडाकेबाज कामगिरीबद्दल पोलीस उपायुक्त आर. रागसुधा यांनी प्रमाणात देऊन विशेष सत्कार करुन गौरव केला. दरम्यान, धाराशिव जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करण्याचे काम त्यांच्या माध्यमातून होत आहे हे विशेष.

अरफत सिद्दीकी हे धाराशिव शहरातील रहिवासी असून ते २००८ मध्ये धाराशिव पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झाले. त्यांनी महिला छेडछाड प्रतिबंधक पथकामध्ये तत्कालीन पोलीस पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक माया पानसे यांच्या समवेत धडाकेबाज कामगिरी केली. या सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी २०१६ मध्ये महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा (एमपीएससी) दिली. ते उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना नाशिक येथे २०१८ मध्ये प्रशिक्षण देण्यात आले. तर डोंगरी पोलिस ठाण्यात २०१९ - २२ व जे जे मार्ग पोलीस ठाणे मुंबई येथे त्यांनी पोलिस उप निरीक्षक काम पाहिले. तसेच ते २०२४ पासून अंतापहिल पोलीस ठाण्यात अंमलबजावणी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या धडाकेबाज कारवाईमध्ये कोणत्याही प्रकारचा खंड पडू दिलेला नाही. त्यांनी ३०० पेक्षा जास्ती प्रतिबंधात्मक कारवाई करीत १० गुंडांना तडीपार केले आहे. तर एका अट्टल गुंडाला महाराष्ट्र धोकादायक क्रियाकलाप प्रतिबंधक कायदा, १९८१ (एमपीडीए) कायद्यांतर्गत धडक कारवाई करीत त्याला एका वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे. या धडाकेबाज कामगिरीबद्दल सिद्दीकी यांच्यासह त्यांच्या पथकातील हेड कॉन्स्टेबल सानप, दहिफळे, पोलीस कॉन्स्टेबल राथोड, सपकाळ यांचा प्रमाणपत्र देऊन विशेष सत्कार करुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यामुळे धाराशिव शहराचे नाव उज्ज्वल करण्याचे काम करणाऱ्या सिद्दीकी यांच्या या अभिमानास्पद कामगिरीचे सर्व स्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे.

# राजे शिवाजी पब्लिक स्कूलमधील आनंद बाजारात पावणे दोन लाखांची उलाढाल



परंडा (प्रतिनिधी) – येथील राजे शिवाजी पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक ज्ञानाची जाणीव निर्माण व्हावी तसेच उद्योजकतेची आवड विकसित व्हावी, या उद्देशाने आनंद बाजार या मार्केट डे उपक्रमाचे आयोजन दि.१२ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. त्यास उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बिभिषण रोडगे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सपोनि प्रविण सिरसट, सुर्यवंशी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रफुल्ल गोडगे, शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. आनंद बाजारात शेकडो विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक दुकाने थाटली होती. खाद्य पदार्थ, खेळणी, शैक्षणिक साहित्य, हस्तकला वस्तू अशा विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान, पैशांचे व्यवस्थापन, ग्राहकांशी संवाद कौशल्य तसेच संघ भावना यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. स्पर्धेत अथर्व सचिन मोरे प्रथम, अनुष्का गणेश सुरवसे द्वितीय तर प्रणव सुर्यवंशी प्रणव व राघव अनंतराव बुरंगे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या आनंद बाजारात तब्बल १ लाख ७६ हजार ९६० रुपयांची उलाढाल झाली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बावची विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे यांनी तर सूत्रसंचालन संजय वलेकर यांनी व उपस्थितांचे आभार शुभम रोडगे यांनी मानले. आनंद, उत्साह आणि शिक्षणाचा अनोखा संगम असलेला हा आनंद बाजार विद्यार्थ्यांचा खरा आनंद असणारा उपक्रम सर्वांच्या कौतुकास पात्र ठरला. यावेळी बबलू जिनेरी, बाबा बहिरे, हाफिजद्दीन करपुडे, पालक सुदाम पाटील, श्री विनोद पाटील, अंगद नलवडे, सचिन मोरे, आबा जगताप, नेमीनाथ मोरे, सुनिल पाटील, पारसराम कोळी, दत्ता नेटके, बालाजी मिस्कीन, आरिफ डोंगरे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नूतन महापौरांनी घेतला मनपाच्या कामकाजाचा आढावा

## सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने सूचना



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/ प्रतिनिधी: लातूरच्या नवनिर्माचित महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे व उपमहापौर स्नेहल उटगे यांनी गुरुवारी (दि.१२) मनपातील अधिकाऱ्यांकडून कामकाजाचा आढावा घेतला. रविवारपासून सुरू होणारी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने त्यांनी विविध सूचनाही केल्या.

महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी व उपमहापौर स्नेहल उटगे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्रारंभिक अधिकाऱ्यांचा व विभाग प्रमुखांचा परिचय करून देण्यात आला.नूतन महापौर व उपमहापौरांनी मनपाचे कामकाज समजून घेतले. पाणीपुरवठा, पथदिवे, अग्निशमन,आरोग्य तसेच सर्व विभागांची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली.

महाशिवरात्री निमित्त रविवार दि.१५ फेब्रुवारी पासून ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेला सुरुवात होत आहे.या यात्रेच्या अनुषंगाने मनपाच्या वतीने केल्या जाणाऱ्या तयारीचा आढावाही महापौरांनी घेतला. यात्रेत मनपाच्या वतीने पाण्याचे टँकर भरून दिले जाते. त्याबाबत माहिती घेतली. यात्रा परिसर व यात्रा मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, पथदिव्यांची दुरुस्ती याबाबतही त्यांनी सूचना केल्या. यात्रा परिसरात गरज पडली तर अग्निशमन दल सेवा तत्पर असावी, असेही महापौरांनी सांगितले. यात्रेच्या अनुषंगाने जे-जे करणे आवश्यक आहे त्या सर्व बाबी प्राधान्याने कराव्यात,असे त्या म्हणाल्या.

दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व परिसराची स्वच्छता, आवश्यक तेथे डागडुजी व सुशोभीकरण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. या बैठकीस गट नेते विजयकुमार साबदे,नगर सेवक धोंडिराम यादव, सचिन गायकवाड,अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त वसुधा फड, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# महाशिवरात्री उत्सवातील 'बाबा महाकाल की शाही सवारी' भव्य शोभा यात्रा ठरणार लातूरकरांसाठी अविस्मरणीय

## महाशिवरात्री उत्सवात लातूरकरांनी सहभागी होण्याचे आयोजकांचे आवाहन

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर - श्री महाकालेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महाकालेश्वर प्रतिष्ठानच्यावतीने लातूर महाशिवरात्री उत्सव २०२६ प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी आयोजित करण्यात आला आहे. रविवार, (दि. १५) फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीचे औचित्य साधून 'बाबा महाकाल की शाही सवारी' भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. महाशिवरात्री उत्सवानिमित्त राजीव गांधी चौक लातूर येथे सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमात लातूरकरांनी उत्साहात सहभागी व्हावे असे आवाहन महाकालेश्वर प्रतिष्ठान, महाशिवरात्री महोत्सव समिती च्यावतीने करण्यात आले आहे.

महाशिवरात्री उत्सवाची सुरुवात रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी होणार असून कार्यक्रमाची रूपरेखा पुढीलप्रमाणे असणार आहे. सकाळी १० वाजता मान्यवरांच्या हस्ते आरती करून महाशिवरात्री उत्सवाची सुरुवात करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ४ वाजता बाबा महाकाल की शाही सवारी या शोभायात्रेस राजीव गांधी चौक येथून सुरुवात होणार आहे तर सोहळ्याची सांगता श्री वैजनाथ महादेव मंदिर (तळ्यातील महादेव) येथे होणार आहे. बाबा महाकाल पालखी सोहळा दरम्यान विविध सांस्कृतिक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून यामध्ये भव्य ढोल पथक, भजनी मंडळी, डमरू व झांज पथक, हलगी पथक, लेझीम पथक, आकर्षक लाईट शो, अवंतिकानाथ अघोरी ग्रुप या वतीने अघोरी नृत्य, शालेय विध्यार्थी देखावा सादर करण्यात येणार आहे. महाशिवरात्री उत्सवाच्या शेवटी तळ्यातील महादेव मंदिर येथे भव्य आतिषबाजी करुन महाशिवरात्री उत्सव २०२६ ची सांगता होणार आहे. श्री महाकालेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महाकालेश्वर प्रतिष्ठानच्यावतीने लातूर महाशिवरात्री उत्सवात लातूरकरांनी उत्साहात सहभागी होऊन सर्व लातूरकरांसाठी आकर्षक ठरणारा बाबा महाकाल शाही सवारी भव्य शोभा यात्रा सोहळा यशस्वी करावा असे आवाहन महाकालेश्वर प्रतिष्ठान, महाशिवरात्री महोत्सव समिती च्यावतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनो तंत्रज्ञानाचा वापर समाजाच्या विकासासाठी करा : प्रा. संजय वायकर

## विश्वेश्वरय्यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील विश्व व्हर्टेक्स २०२६ चे उद्घाटन

**दै. अदिती एक्सप्रेस**

औसा (प्रतिनिधी) : तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील विश्व व्हर्टेक्स २०२६ चे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे- रायगड चे विशेष कार्य अधिकारी प्रा. संजय वायकर, श्री अंकित गायकवाड, संचालक, स्किल्झवे टेक्नॉलॉजीज प्रा. लि. लातूर, प्रा. पि.डी. घुंगरे, योगेश्वरी पॉलिटेक्निक, अंबाजोगाई, श्री एस. जी. आरताफ यांच्या शुभहस्ते व संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, विभाग प्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. अंकुश बिडवे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अब्दुल समद काझी, प्रा. अजित लोकरे, यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी या विश्व व्हर्टेक्स सारख्या टेक्निकल इव्हेंन्टसचे आयोजन विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, आजच्या स्पर्धे च्या युगात तंत्रज्ञानाचे कौशल्य विद्यार्थ्यांना अवगत व्हावे या उद्देशाने आयोजन करण्यात आले असुन संस्थेच्या वतीने राबविल्या जाणाऐया विविध उपक्रमाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना एक प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्याच्या दिशेने उचललेले पाऊल असल्याचे सांगुन महाराष्ट्रातुन सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. संजय वायकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रथम विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाने अशा प्रकारचा टेक्निकल इव्हेंन्टचे आयोजन करून विद्यार्थ्यामध्ये तंत्रज्ञानाविषयीचे अवेअरनेस निर्माण केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांचे कौतुक केले. पुढे बोलताना अशा टेक्निकल इव्हेंन्टमधुनच मिळणाऐया नवनविन तंत्रज्ञानाचा वापर समाजातील सामाजिक समस्या सोडविण्यासाठी करा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कारण एक इंजिनीअर दुनिया बदल सकता है त्यामुळे प्रत्येकाने नवनविन तंत्रज्ञान अवगत करून स्वत:ला सिध्द करा कारण खरा भारत ग्रामीण भागातच आहे असे सांगुन सहभागी झालेल्या सर्व विविध अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यामध्ये संशोधनात्मक वृत्ती निर्माण व्हावी आणि त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी संस्थेच्या माध्यमातुन विविध तांत्रिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक क्षेत्रातील उपक्रम राबवुन विद्यार्थी घडविण्याचे काम संस्था मागील १५ वर्षापासुन अविरतपणे करत असल्याचे सांगितले. अशा उपक्रमामधुन मिळालेल्या तंत्रज्ञानाचा वापर समाजाच्या विकासासाठी करावा असे सांगुन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या टेक्निकल इव्हेंन्टमध्ये पेपर प्रेझेन्टेशन करिता १२३, पोस्टर प्रेझेन्टेशन करिता ९२, प्रोजेक्ट कॉम्पिटीशन साठी ४८, क्विझ कॉम्पिटीशनसाठी ५६७, हॅकॅथॉन करिता ६३, कॅड मास्टरकरिता २२ अशा एकुण ९१५ विविध अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या टेक्निकल इव्हेंन्टकरिता परिक्षक म्हणुन प्रा. आर. व्ही. महागावकर, पुरणमल लाहोटी शासकीय अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था,लातूर, प्रा. तोंडारे एस. एम, व्हिआयटी इंजिनीअरिंग कॉलेज, टेक्नोसॉफ्ट डिजीटल स्पेस प्रा. लि. चे संचालक- प्रताप लोखंडे, गौरव काळगे, अंकिता कदम, अस्मा चुडीवाले, एम.एस. बिडवे इंजिनीअरिंग कॉलेजचे प्रा. सुरज बिराजदार, प्रा. राहुल मंठाळे, व्हिडीएफ स्कुल ऑफ इंजिनीअरिंगचे प्रा. अजिम शेख यांनी काम पाहिले. या विश्व-व्हर्टेक्स टेक्निकल इव्हेन्टसाठी प्रायोजक म्हणुन टेक्नोसॉफ्ट प्रा. लि., लातूर, स्किल्झवे, प्रा. लि. लातूर, गटागट बुक स्टोअर, लातूर, नेक्स्ट जेन रोबोटिक्स यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागप्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अजित लोकरे, प्रा. अब्दुल समद काझी, यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. योगेश पाटील यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य प्रा. गोपाळ दंडिमे यांनी केले.

# नवनिर्वाचित सदस्य तानाजी बिरादार यांची प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट; आरोग्य सुविधांचा घेतला सखोल आढावा






**दै. अदिती एक्सप्रेस**

निलंगा प्रतिनिधी :- हलगरा जिल्हा परिषद गटाचे नवनिर्वाचित सदस्य मा.श्री तानाजी बिरादार आप्पा यांनी आज प्राथमिक आरोग्य केंद्र, हलगरा येथे अचानक भेट देत आरोग्य सेवांचा सखोल आढावा घेतला. निवडून आल्यानंतर तात्काळ कामाला सुरुवात करत त्यांनी ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांशी चर्चा करत औषधसाठा, मनुष्यबळ, रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा तसेच प्रलंबित मागण्यांबाबत सविस्तर माहिती घेतली. ग्रामस्थांना दर्जेदार व तत्पर आरोग्य सेवा मिळाल्याच पाहिजेत, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. कमतरता आढळल्यास त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या.

जनतेने विकासासाठी दिलेला कौल आम्ही कामातून सिद्ध करू. आरोग्य सेवा ही ग्रामीण भागाची जीवनरेखा आहे. हलगरा प्राथमिक आरोग्य केंद्र अधिक सक्षम करण्यासाठी पाठपुरावा करू, असे मा. बिरादार यांनी यावेळी सांगितले. यावेळी हलगरा गावचे तंटामुक्ती अध्यक्ष तथा माजी सैनिक दुष्यंत सगरे यांची उपस्थिती होती. स्थानिक ग्रामस्थांनीही विविध मागण्या मांडल्या.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे हीच शाळेची खरी भूमिका : ज्ञानदेव सानप

## सानेगुरुजी विद्यालयाचे वार्षिक संमेलन संपन्न

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर / प्रतिनिधी- आपली खरी संपत्ती म्हणजे आपली मुले. त्यांना सुसंस्कृत व जबाबदार नागरिक बनवणे ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शाळा करत असते,असे प्रतिपादन कार्यक्रमाचे उद्घाटक तथा एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव सानप यांनी केले. साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष भागवतराव माने होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गातेगाव सोसायटीचे चेअरमन वीरसेन भोसले, संस्था सचिव कालिदास माने, कोषाध्यक्ष सुरेखा माने, प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने, उषा आडे व नागोराव कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे शाल व पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक संस्था सचिव कालिदास माने यांनी केले. वार्षिक स्नेहसंमेलनात सुमारे २५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, नाटिका व कला सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविले. उपस्थित पालक व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचलन गणेश परळे व सौ. मीनाक्षी यादव यांनी केले तर आभार मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लातूर परिमंडलातील चार लाखाच्यावर वीजग्राहक घेत आहेत स्मार्ट वीज मीटरचा लाभ

## अचूक बिल आणि वीज दरात मिळतेय सवलत

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर / प्रतिनिधी- महावितरणने राज्यातील सर्व वीज ग्राहकांसाठी 'स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे)' वीजमीटर उपलबध करून दिले असून, यामुळे ग्राहकांना केवळ अचूक बिलच मिळणार नाही, तर वीजदरात सवलत मिळवण्याची सुवर्णसंधीही उपलब्ध झाली आहे. लातूर,धाराशिव व बीड जिल्हयाचा समावेश असलेल्या लातूर परिमंडलात आतापर्यंत चार लाख २६ हजार ४९ वीजग्राहकांकडे स्मार्ट टीओडी वीजमीटर बसवण्यात आले असून, त्यांना अचूक बिलासह सवलतीचा लाभ होत आहे. या उपक्रमाबाबत काही लोकांकडून गैरसमज पसरवले जात आहेत. मात्र ग्राहकांनी अफवेला बळी न पडता स्मार्ट मीटर बसवण्यास सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणचे लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

महावितरणने यापूर्वीही काळानुसार वीज मीटरमध्ये बदल केले आहेत. यांत्रिक, इलेक्ट्रोमॅग्नेटिक, इलेक्ट्रॉनिक मीटरनंतर आता स्मार्ट डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. जुने, सदोष किंवा नादुरुस्त मीटर बदलणे ही नियमित व कायदेशीर प्रक्रिया असून, त्यासाठी ग्राहकांची लेखी परवानगी आवश्यक नाही. ग्राहकांकडे बसवण्यात येणारे स्मार्ट टीओडी मीटर मोफत असून, त्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जात नाही. यासाठी कोणतेही कर्ज काढलेले नसून केंद्र सरकारच्या अनुदानातून हा प्रकल्प राबवला जात असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. लातूर परिमंडलात आजपर्यंत ४ लाख २६ हजार ४९ वीजग्राहकांडे स्मार्ट टीओडी मीटर बसवण्यात आले आहेत. त्यात लातूर मंडलात २ लाख ३८४, बीड मंडलात १ लाख ०३ हजार ५३६ तर धाराशिव मंडलात १ लाख २२ हजार १२३ स्मार्टमीटर सर्व वर्गवारीतील ग्राहकांकडे बसवण्यात आले आहेत.

विजेच्या दिवसा वापरावर सवलत स्मार्ट टीओडी मीटर डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित आहे. यात दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेनुसार वीज वापर मोजण्याची सुविधा आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपयापर्यंत सवलत मिळत आहे. १ जुलै २०२५ पासून ही सवलत लागू झाली आहे. एखादा घरगुती ग्राहक दरमहा १०० युनिट वीज वापरत असेल, तर जुन्या दरानुसार त्याचे बिल साधारणतः ८७५ रुपये येत होते. नवीन दरकपात आणि स्मार्ट मीटरच्या टीओडी सवलतीमुळे हेच बिल आता फक्त ७८४ रुपयांपर्यंत खाली येऊ शकते.

सौर ऊर्जा ग्राहकांसाठी वरदान

'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने' अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प लावणाऱ्या ग्राहकांसाठी हे मीटर उपयुक्त आहे. हे मीटर नेट-मीटरिंगचे कामही करते, ज्यामुळे तुम्ही ग्रीडला दिलेली अतिरिक्त वीज आणि स्वतः वापरलेली वीज याचा अचूक हिशेब ठेवणे सोपे होईल. सरासरी बिले होणार इतिहासजमा

अचूक रीडिंगमुळे 'सरासरी' किंवा 'अंदाजे' बिलांचा त्रास संपणार आहे. जेवढी वीज वापरली, तेवढेच बिल येणार. मीटर पूर्णपणे पोस्टपेड आहेत. सध्याच्या मासिक पद्धतीप्रमाणेच ग्राहकांना बिल भरायचे आहे. महावितरणच्या खास 'अॅप'वर तुम्हाला तासागणिक किती वीज वापरली जात आहे, याची माहिती मिळेल. घर बंद असले तरी मीटर रीडिंग आपोआप मुख्यालयात नोंदवले जाईल.

# चार्ल्स डार्विननी उत्क्रांतीचा सिद्धांत मांडून आधुनिक जीवशास्त्राची पायाभरणी केली

## दयानंद विज्ञानमध्ये चार्ल्स डार्विन यांच्या जयंतीनिमित्त सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर : दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी चार्ल्स डार्विन यांच्या २१७ वी जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाले अंतर्गत विशेष सेमिनाराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते चार्ल्स डार्विन यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी चामे निलाक्षी हिने चार्ल्स डार्विन यांच्या जीवनप्रवास, संशोधन कार्य तसेच जैवविविधता,



उत्क्रांती सिद्धांत व जैव-भौगोलिक विभागणी क्षेत्रातील त्यांच्या मोलाच्या योगदानावर सविस्तर सादरीकरण केले.सादरीकरणात चार्ल्स डार्विन यांनी उत्क्रांतीचा सिद्धांत मांडून आधुनिक जीवशास्त्राची पायाभरणी केली.नैसर्गिक निवड प्रक्रियेमुळे प्रजाती काळानुसार बदलतात, हे त्यांनी सिद्ध केले. बीगल जहाजावरील प्रवासात त्यांनी विविध सजीवांचे निरीक्षण केले आणि 'ऑन द ओरिजिन ऑफ स्पेसिस ' हे महत्त्वाचे पुस्तक लिहिले. त्यांच्या कार्यातून वैज्ञानिक विचारसरणी, तार्किकता व पर्यावरणीय जबाबदारी यांची सांगड घालण्याचा संदेश मिळतो.याप्रसंगी विभागातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.